अकोला ●बुधवार, २८ फेब्रुवारी, २०२४ ▸ आर.एन.आय.रजि.क्र. MAHMAR/2016/71990 ▸ वर्ष : ८ ▸ अंक : २० ▸ पृष्ठे ४ ▸ किंमत २ रु. १

# वऱ्हाडवृत्त

झाडे लावा झाडे जगवा!

www.varhadvrutt.com कोंडलेल्या मनाचा हुंकार ...

▸ संपादक : **सागर बाबाराव लोडम**
▸ सहसंपादक : **सौ.प्रियंका सागर लोडम**

आज स्मृतिदिन



डॉ. राजेंद्र प्रसाद

ज्ञान–नीति–सौंदर्य

साहित्य, संगीत, नृत्य, चित्र, शिल्प या कलांच्या सर्जनशीलतेच्या आविष्कारातून निर्माण होणाऱ्या सामाजिक मूल्यांची रुजवातसाठी डिजिटल व्यासपीठ....

वऱ्हाडवृत्त

पहा आमची वेबसाईट

www.varhadvrutt.com

## नामकरण भोवले; 'त्या' अधिकाऱ्याचे निलंबन

### सिंहिण सीता आणि सिंह अकबर यांची नाव त्वरित बदला; उच्च न्यायालयाने खडसावले

कोलकाता : सिंह अन् सिंहिणीची अकबर आणि सीता अशी नावे ठेवून धार्मिक भावना दुखावल्याचा आरोप करत विश्व हिंदू परिषदेने कोलकाता उच्च न्यायालयात एक याचिका केली होती. त्यावरून त्रिपुरातील प्राणिसंग्रहालयातील अधिकाऱ्याला त्रिपुरा सरकारने निलंबित केले आहे. नामकरणावरून झालेल्या वादाच्या पार्श्वभूमीवर त्रिपुरा सरकारकडून राज्याचे प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव आणि पर्यावरण पर्यटन) प्रवीण लाल अग्रवाल यांना निलंबित करण्यात आले आहे.

त्रिपुरातील सेपाहिजाला प्राणिसंग्रहालयातून १२ फेब्रुवारीला उत्तर बंगालच्या सिलीगुडी येथील सफारी पार्कमध्ये आणलेल्या वन्य प्राण्यांची विचित्र नावे एका बातमीवरून समजले. बांगला वृत्तपत्र उत्तरबंगा संवादमध्ये यासंदर्भात बातमी छापून आली होती. त्यानंतर हा वाद उफाळून आला. देशभरातील सर्व हिंदूंच्या धार्मिक भावना दुखावल्याचं सांगत विश्व हिंदू परिषदेने याविरोधात याचिका दाखल केली. उत्तरबंगा संवादने राज्य प्राणिसंग्रहालय प्राधिकरणाच्या सचिवाने जारी केलेल्या प्रसिद्धिपत्रकाची माहिती प्रकाशित केली, ज्यात सिंहांच्या नावांचा उल्लेख आहे. त्यानंतर विश्व हिंदू परिषदेने हे अतार्किक आणि अपमानजनक नामकरण असल्याचे सांगत कोलकाता उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. त्रिपुराच्या सिपाहिजाला प्राणिसंग्रहालयातून आठ प्राणी सिलिगुडी सफारी पार्कमध्ये आणण्यात आले. यात 'अकबर' आणि 'सीता' नावाच्या सिंह आणि सिंहिणीचाही समावेश आहे. १६ फेब्रुवारी रोजी विहिंपने याबाबत कोलकाता उच्च न्यायालयात धाव घेतली. सिंह आणि सिंहिणीला 'अकबर' आणि 'सीता' असे नाव देणे हा हिंदूंचा अपमान असल्याचे विहिंपने म्हटले आहे.

न्यायमूर्ती भट्टाचार्य यांच्या खंडपीठासमोर २१ फेब्रुवारी रोजी या प्रकरणाची सुनावणी झाली. सिंहिणीला सीतेचे नाव का दिले, हे नाव स्नेहभावाने ठेवता आले असते, असं न्यायमूर्तींचे म्हणणे होते. त्यावर याचिकाकर्त्यांच्या वकिलांनी, ही हिंदू धर्माची निंदा आहे. जर प्राण्यांना देवतांची नावे देण्यास परवानगी दिली तर उद्या गाढवाचे नाव देखील एखाद्या देवतेच्या नावावरून ठेवले जाईल, असा युक्तिवाद केला. त्यानंतर न्यायालयाने राज्य सरकारला या विषयावर स्पष्टीकरण देण्यास सांगितले. कोलकाता उच्च न्यायालयाने राज्य सरकारला नाव बदलण्यास सांगितले आहे.

## जबाबदार लोक पोरकट बोलताहेत; शरद पवारांचे प्रत्युत्तर

पुणे : पुण्यातील निसर्ग मंगल कार्यालयात शरद पवार आणि सुप्रिया सुळेंकडून बारामती लोकसभा मतदारसंघातील पक्षाच्या पदाधिकाऱ्यांची मंगळवारी बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठक संपल्यानंतर माध्यमांशी संवाद साधताना शरद पवारांनी सत्ताधाऱ्यांनी केलेल्या टीकेला प्रत्युत्तर दिले.

यावेळी बोलताना शरद पवारांना मनोज जरांगे हे तुमची स्क्रीप्ट बोलातायेत असा आरोप मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी केला असे विचारले असता ते म्हणाले की, जबाबदार पदावर बसणारे लोक असे पोरकट बोलतायेत हे मी महाराष्ट्रात कधीही पाहिलं नाही. मी यशवंतराव चव्हाणांपासून महाराष्ट्र बघतोय. मनोज जरांगे पाटील यांचं उपोषण सुरू झाल्यानंतर पहिल्यांदा त्यांना भेटायला मी गेलो होतो. त्यावेळी त्यांना भेटून तुमच्या मागण्या मी समजू शकतो. परंतु तुमच्या मागण्यामुळे दोन समाजात तेढ निर्माण होईल अशी भूमिका मांडू नका. महाराष्ट्रातील सामाजिक ऐक्य टिकेल अशी भूमिका ठेवा. इतर समाजाप्रती असलेली कटुता योग्य नाही हे त्यांना मी त्यांना म्हणालो होतो असे म्हणत शरद पवारांनी सत्ताधाऱ्यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. तर आमदार राजेश टोपे यांच्याबाबत विचारले असता शरद पवार म्हणाले की, त्यांची मदत सरकार घेत होतं, हा प्रश्न सोडविण्यासाठी आणि आता त्यांच्यावर आरोप करणं चुकीचं आहे. असेसुद्धा शरद पवार यावेळी म्हणाले.

## मनोज जरांगे–पाटील यांच्याकडून उपोषण स्थगित



मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे–पाटील यांनी त्यांचं उपोषण स्थगित केलं आहे. मुंबईला जाण्याचा निर्णय मागे घेतल्यानंतर ते आज सकाळी आंतरवाली सराटी इथं पोहोचले. मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे कलमाची अंमलबजावणी तत्काळ करण्याची मागणीही त्यांनी केली. मराठा समाज बांधवानी गर्दी न करता घरी जावं, असं आवाहन त्यांनी केलं. उपोषण मागं घेतल्यानंतर ते उपचारासाठी छत्रपती संभाजीनगर इथल्या गॅलेक्सी रुग्णालयाकडे रवाना झाले.जालना जिल्ह्यातल्या अंबड तालुक्यातल्या तीर्थपुरी इथं एक एसटी बस पेटवली. यामुळं जालना जिल्ह्यातली संपूर्ण बस सेवा पहाटेपासून बंद आहे. बीडहून छत्रपती संभाजीनगर, जालनाकडे जाणारी बस सेवाही सकाळपासून बंद आहे.

## बिगरमोसमी पाऊस नुकसानाची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी



अकोला, दि. 27 : जिल्ह्यात बिगरमोसमी पावसाने झालेल्या नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे आदेश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

जिल्ह्यात अनेक ठिकाणी बिगरमोसमी पाऊस व गारपीट झाली. त्यामुळे झालेल्या नुकसानाची जिल्हाधिकाऱ्यांनी पाहणी केली. अकोला तालुक्यातील वल्लभनगर, निंभोरा, कासली आदी गावांतील शेतीक्षेत्राची पाहणी जिल्हाधिकाऱ्यांनी केली. जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे, इतर अधिकारी व परिसरातील शेतकरी बांधव उपस्थित होते.

जिल्ह्यात बिगरमोसमी काही ठिकाणी गहू, हरबरा, कांदा तसेच इतर भाजीपाला पिकांचे नुकसान झाले. त्याची दखल घेऊन जिल्हाधिकाऱ्यांनी तत्काळ शेतीक्षेत्रात जाऊन पीक नुकसानाची पाहणी केली, नुकसानाबाबत कृषी, महसूल विभागांनी तत्काळ पंचनामा करून अहवाल सादर करावा, असे निर्देश त्यांनी दिले. प्रत्येक बाबीची काळजीपूर्वक नोंद घ्यावी व कार्यवाही तातडीने पूर्ण करावी, असे निर्देश त्यांनी दिले. यावेळी जिल्हाधिका–यांनी शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांचे म्हणणे जाणून घेतले.

## बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर टाकलेला बहिष्कार शिक्षक संघाकडून मागे

शिक्षक संघाने बारावीच्या उत्तरपत्रिका तपासणीवर टाकलेला बहिष्कार मागे घेतला आहे.शालेय शिक्षण मंत्री दीपक केसरकर यांनी कनिष्ठ महाविद्यालय शिक्षक संघाच्या पदाधिकाऱ्यांशी त्यांच्या मागण्यांबाबत काल चर्चा केली. शिक्षकांचं समायोजन, १२ आणि २४ वर्षानंतरची कालबद्ध पदोन्नती, २४ वर्षानंतर २० टक्क्याप्रमाणे दिल्या जाणाऱ्या पदोन्नतीऐवजी एकाच वेळेला सर्वांना पदोन्नती देणं, यासारख्या मागण्यांसंदर्भात यावेळी सकारात्मक चर्चा झाली.

## गहू आणि हरभरा जमीनदोस्त रब्बी ज्वारी आणि मका भुईसपाट घरांचे नुकसान आणि वृक्ष कोसळले

अकोला : खारपाणपट्ट्यातील उभी असलेली पिके उद्धवस्त... गारपीट व मुसळधार पाऊस आणि वादळी वाऱ्याचा तडाखा... हातातोंडाशी आलेला घास हिरावला... पावसामुळे घरांचे नुकसान... वादळी वाऱ्यामुळे घरावरील टीन पत्रे उडाली तसेच वृक्ष कोसळले... मोठ्या कष्टाने जगवलेल्या पिकाची विदारक स्थिती पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यात अश्रू दाटले. निसर्ग कोपल्याने पिकांचे नुकसान होऊन शेतीला लावलेला खर्च पाण्यात गेला. सरकारने संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना मदत जाहीर करण्याची मागणी होत आहे. शिंगोली, दुधाळा, मंडाळा, लोणाग्रा, हातला, मालवाडा, मांजरी, बोरगाव वैराळे, अंदुरा भाग एक, अंदुरा भाग दोन, हातरुण शेतशिवारात सध्या हरभरा आणि गहू सोंगणीची लगबग सुरू आहे. सोंगणी केलेला हरभरा, रब्बी तूर आणि गव्हाची अनेक शेतात गंजी लावण्यात आल्या आहेत.

वऱ्हाडवृत्त
अकोला, वर्ष ८, अंक २०,
बुधवार, २८ फेब्रुवारी, २०२४
www.varhadvrutt.com

संपादकीय

## अजूनही वैज्ञानिक विचारांचा अभाव

आपला देश विज्ञानाच्या क्षेत्रात सातत्याने प्रगती करत आहे. अलीकडेच चांद्रयान–३ च्या यशाने जगाला सांगितले की विज्ञानाकडे आपला दृष्टिकोन काय आहे. आपले शास्त्रज्ञ अमेरिका, रशिया, चीन यांसारख्या देशांच्या वैज्ञानिकांपेक्षा कमी नाहीत. याशिवाय खेड्यांमध्येही वैज्ञानिक विचार वाढला आहे. लोक विज्ञानात रस दाखवू लागले आहेत. तरीही, काही उणिवा आहेत ज्यावर आम्हाला काम करणे आवश्यक आहे. सर्वप्रथम सरकारांना विज्ञान शिक्षण आणि संशोधनाबाबत विशेष गांभीर्य दाखवावे लागेल. भारतात विज्ञानाच्या क्षेत्रात अनमोल हिरे आहेत, पण त्यांना मागदर्शन करण्याचे काम संथ गतीने सुरू आहे. यामुळेच भारतीय वंशाचे अनेक शास्त्रज्ञ इतर देशांमध्ये जाऊन त्यांचे संशोधन कार्य पूर्ण करतात, त्यामुळे त्या देशाचे कौतुक होत आहे. आपल्या देशात विज्ञानाशी संबंधित संशोधनाबाबत गांभीर्य दाखविल्यास भारत प्रत्येक तंत्रज्ञानाच्या विकासात नेतृत्वाची भूमिका बजावू शकतो. तसेच आर्थिक अडचणींमुळे अनेक हुशार विद्यार्थ्यांना त्यांचे वैज्ञानिक शिक्षण घेता येत नाही. त्यांना प्रगत प्रयोगशाळा आणि इतर सुविधांची गरजआहे. अनेक जण विज्ञान विषयापासून दूर राहतात कारण त्यांना त्यात भविष्य नाही असे वाटते. त्याऐवजी, ते असे व्यावसायिक विषय निवडतात जे त्यांना लवकर कमावण्याची मार्ग देऊ शकतात. बहुधा हेच कारण आहे की आपण वैज्ञानिक संशोधन आणि संशोधनात इतर देशांच्या तुलनेत मागे आहोत. तर आपल्या तरुणांनी अमेरिकेत सिलिकॉन व्हॅलीचा पाया रचला आहे. साहजिकच आपल्या सरकारांना तत्परता दाखवावी लागेल. त्यांना अनेक आघाड्यांवर काम करावे लागणार आहे. प्राथमिक स्तरावर हे काम शाळा–महाविद्यालयांमध्ये व्हायला हवे जेणेकरून जास्तीत जास्त मुलांना विज्ञानाशी संबंधित विषयांचा अभ्यास करता येईल. मग, त्यांना प्रगत प्रयोगशाळांच्या सुविधा द्याव्या लागतील, जेणेकरून ते त्यांच्या इच्छेनुसार संशोधन करू शकतील. त्यासाठी त्यांना आवश्यक ती आर्थिक मदतही द्यावी लागणार आहे. भारत सरकार या बाबतीत काम करत आहे हे खरे आहे, परंतु त प्रयत्न आवश्यकतेनुसार ते कमी पडतात. आपले हुशार विद्यार्थी देश सोडून परदेशात जाऊ नयेत, असे वातावरण आपल्याला निर्माण करावे लागेल. यामुळे प्रतिभावंतांचे स्थलांतर तर होतेच शिवाय देशाचे आर्थिक नुकसानही होते. राष्ट्रीय विज्ञान दिनानिमित्त देशात अधिक चांगले वैज्ञानिक वातावरण निर्माण करण्याचा संकल्प केला पाहिजे.

## राष्ट्रीय विज्ञान दिन

संपूर्ण देशात आजचा दिवस हा राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. २८ फेब्रुवारी १९२८ रोजी नोबेल पारितोषिक विजेते भारतीय शास्त्रज्ञ सर सी व्ही रामन यांनी रामन इफेक्ट हा वैशिष्टयपूर्ण शोधनिबंध जगासमोर सादर केला होता. त्या दिवसाचे औचित्य साधून हा दिवस राष्ट्रीय विज्ञान दिन म्हणून साजरा केला जातो. भारतात शास्त्रीय, शैक्षणिक, वैद्यकीय, तांत्रिक, संशोधन आणि सर्व महाविद्यालये, विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, शास्त्रज्ञ, संशोधक हा दिवस उत्साहाने साजरा करतात.

भारतासाठी पहिले नोबेल पारितोषिक मिळवून देणारे जेष्ठ शास्त्रज्ञ भारतरत्न सर सी व्ही रामन यांनी २८ फेब्रुवारी १९२८ या दिवशी भौतिक शास्त्रातील अत्यंत महत्त्वपूर्ण अशा प्रकाशाच्या विकीरणासंबंधी संशोधन करून त्याविषयीचा वैशिष्ट्यपूर्ण शोधनिबंध जागतिक पातळीवर सादर केला. त्यांच्या या शोध निबंधाला १९३० साली मान्यता मिळाली आणि त्याच वर्षी या संशोधनासाठी त्यांना नोबेल पुरस्कार जाहीर झाला. सी व्ही रामन हे नोबेल पारितोषिक मिळवणारे पहिले आशियाई शास्त्रज्ञ आहेत.

त्यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून त्यांच्या जन्मशताब्दी वर्षापासून म्हणजेच १९८७ पासून २८ फेब्रुवारी हा दिवस राष्ट्रीय विज्ञान म्हणून साजरा म्हणून साजरा केला जातो. रामन यांचा जन्म ७ नोव्हेंबर १८८८ रोजी मद्रास येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव चंद्रशेखर व्यंकट रामन असे होते. शालेय वयात रामन हे अत्यंत तल्लख बुद्धीचे होते. रामन यांनी ११ व्या वर्षीच शालेय शिक्षण पूर्ण केले. १५ व्या वर्षी ते इंग्रजी आणि विज्ञानामध्ये पदवीधर झाले तर १७ व्या वर्षी भौतिक शास्त्रात पदव्युत्तर शिक्षण मद्रासमध्ये उच्च श्रेणीमध्ये पूर्ण केले. त्यांनंतर ते कोलकाता येथे डेप्युटी अकाउंटट जनरल पदावर रुजू झाले झाले पण या नोकरीत त्यांचे मन रमेना म्हणून त्यांनी कोलकाता येथे कमी पगारात भौतिक शास्त्राचे प्राध्यापक म्हणून काम केले. प्राध्यापक म्हणून अध्यापन करीत असतानाही त्यांनी आपले संशोधन सुरूच ठेवले. १९२१ मध्ये कोलकाता विद्यापीठाने त्यांना उच्च शिक्षणासाठी ब्रिटनला पाठवले.

तिथे त्यांनी लंडनच्या रॉयल सोसायटीमध्ये भारतीय तंतुवाद्ये हा शोधनिबंध सादर केला. पुढे १९३५ मध्ये भारतीय तंतुवाद्ये विशेष करून तबल्याचा नादनिर्मिती, तबल्याची पुडी, शाई, तरंगलांबी इत्यादींवर संशोधन केले. युरोपातून समुद्रमार्गे भारतात येत असताना आकाशातील निळा रंग पाहून त्यांना या रंगाविषयी कुतूहल जागृत झाले. आकाश निळ्या रंगाचेच का दिसते असा प्रश्न त्यांना पडला. त्यांचे उत्तर शोधण्यासाठी त्यांनी पाणी, बर्फ यामधून प्रकाशाचे विकिरण यावर संशोधन सुरू केले. या संशोधनातून त्यांना आकाशाच्या निळ्या रंगाचे उत्तर मिळाले.

रामन इफेक्ट म्हणजे प्रकाशाचे विकिरणच. प्रकाशाचे विकिकरण हा एक दृश्य परिणाम आहे. अशा प्रकारचे किरण सरळ जेंव्हा आपल्या डोळ्यांत शिरतात, तेंव्हाच आपल्याला प्रकाशाच्या अस्तित्वाची जाणीव होते. रामन हे सुरवातीला स्फटिकांच्या अणू रचनेसंबंधी आढळणाऱ्या रचना साधर्म्याशी अपवादात्मक असा अभ्यास करत होते. या दरम्यान १९२८ साली त्यांना असे आढळून आले की विकिरीत प्रकाशामध्ये मूळ प्रकाशाइतक्या, तरंग लांबीच्या किरणांबरोबर इतरही प्रकाश किरणांचे अस्तित्व असते, ज्यांचा मागमूसही मूळ प्रकाश किरणांमध्ये नव्हता. या नवीन किरणांचा जास्त अचूक अभ्यास करण्यासाठी त्यांनी पाऱ्याच्या विद्युतदीपाघटापासून मिळणारी तरंग लांबी अभ्यासली आणि त्यातून त्यांच्या नवीन निष्कर्षाला, संशोधनाला बळकटी मिळाली. प्रकाशामध्ये कण स्वरूपाशी साधर्म्य सांगणारे काही गुणधर्म असतात, त्यांच्या प्रकाश कनिकांमधील ऊर्जा ही त्या प्रकाशाच्या कंपन संख्येच्या समप्रमाणात असते. त्यांचा हाच शोधनिबंध रामन इफेक्ट म्हणून ओळखला जाऊ लागला. त्यांच्या या अत्यंत मौलिक आणि आणि अनमोल अशा संशोधनामुळे पुढे अनेक शोध लागले. भौतिक शास्त्रात सध्या जे शोध लागत आहेत त्याचे मूळ याच रामन इफेक्ट मध्ये सामावलेले असते. रामन इफेक्टमुळे माहितीचे भांडार खुले झाले. त्यामुळेच देशातील देशातील १७ विद्यापीठांनी तसेच जगातील ८ विद्यापीठांनी त्यांना सन्मानीय डॉक्टरेट फेलोशिप बहाल केली. १९४३ मध्ये रामन यांनी बंगलोर येथे रामन संशोधन संस्थेची स्थापना केली. या संशोधन संस्थेत भौतिक शास्त्रातील संशोधनाला अग्रक्रम देण्यात आला. १९५४ साली भारत सरकारने भारतरत्न हा सर्वोच्च पुरस्कार देऊन त्यांचा गौरव केला. १९५७ साली आंतरराष्ट्रीय लेनिन पुरस्कारासाठी त्यांची निवड झाली. आपण लावलेल्या शोधाचा उपयोग रचनात्मक कार्यासाठी व्हायला हवा विध्वंसक कार्यासाठी त्याचा उपयोग होऊ नये असे त्यांचे मत होते. १२ नोव्हेंबर १९७० रोजी त्यांचे निधन झाले.

श्याम ठाणेदार,

## भारताचे पहिले राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद

डॉ. राजेंद्र प्रसाद यांचा आज स्मृतिदिन. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील ते एक थोर नेते आणि भारताचे पहिले राष्ट्रपती होते. त्यांचा जन्म ३ डिसेंबर १८८४ रोजी बिहारमधील जीरादेई या ठिकाणी झाला. त्यांचे प्राथमिक शिक्षण मौलवींतर्फे घरीच पारंपरिक पद्धतीने झाले. त्यात उर्दू आणि फार्सी या भाषाशिक्षणावर अधिक भर होता. पुढे छपरा, हथवा व पाटणा या ठिकाणी शालेय शिक्षण घेऊन त्यांनी कोलकात्यातील प्रेसिडेन्सी महाविद्यालयांतून बीए (१९०६), एमए (१९०८), बीएल (१९०९) व एमएल (१९१५) या पदव्या मिळविल्या.

सुरुवातीस काही वर्षे त्यांनी अध्यापनाचे काम केले आणि नंतर कोलकाता उच्च न्यायालयात वकिलीस प्रारंभ केला (१९११). काँग्रेसच्या कोलकाता अधिवेशनात स्वयंसेवक म्हणून त्यांनी काम केले (१९०६). पाटणा नगर परिषदेचे ते अध्यक्षही होते. ते पुढे १९११ मध्ये काँग्रेसचे सभासद झाले. बिहारच्या १९१७ च्या चंपारण्य सत्याग्रहाच्या वेळी महात्मा गांधींशी त्यांचा परिचय वाढला. त्यांनी महात्मा गांधींच्या चतु:सूत्रीचा पुरस्कार केला आणि वकिली व्यवसाय सोडला. पाटण्यात त्यांनी राष्ट्रीय विद्यापीठ स्थापून स्वदेशी, मद्यपानबंदी, खादीचा प्रसार इत्यादी कार्यक्रम हाती घेतले.

बिहारमध्ये १९३४ साली फार मोठा भूकंप झाला. मदत समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी अतोनात परिश्रम घेऊन ३८ लाख रुपयांचा भूकंप निधी जमा केला. प्रकृतीची पर्वा न करता त्यांनी रात्रंदिवस गोरगरिबांसाठी काम केले. १९३४ च्या मुंबई काँग्रेस अधिवेशनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली.

## गझल गायकीच्या दुनियेतील बेताज बादशाह काळाच्या पडद्याआड

आपल्या आगळ्या वेगळ्या गायकीसाठी केवळ भारतच नाही तर जगभरामध्ये ज्यांची ख्याती होती अशा पंकज उधास यांच्या निधनाच्या बातमीने चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे. त्यांच्या जाण्याने भारतीय संगीतविश्वावर मोठी शोककळा पसरली आहे बॉलीवूडमध्ये गेल्या चार दशकांहून अधिक काळ पंकज उधास यांनी आपल्या गायकीने वेगळी ओळख तयार केली होती. चिट्ठी आई है’ सह अनेक गाण्यांच्या माध्यमातून पंकज उधास यांनी चाहत्यांच्या मनावर राज्य केलं कॅसेटचा काळ असतानाचा सुपरहिट गायक अशी पंकज उधास यांची ओळख होती. ’ना कजरे की धार’, ’आज फिर तुमपे प्यार आया है..’ ’जिये तो जिये कैसे’, ’और आहिस्ता’ अशी किती तरी गाणी आहेत जी आजही प्रेक्षकांना आठवतात ती त्यांच्या शब्दांमुळे आणि पंकज उधास यांच्या मधुर आवाजामुळे.यांना गजलचा बादशहा म्हटले जाते. १७ मे १९५१ रोजी गुजरातमधील जेतपर येथे त्यांचा जन्म झाला. गजलला महत्त्व मिळवून देण्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्या अनेक गजल चाहत्यांच्या हृदयाला स्पर्श करुन जातात.



केशुभाई उधास आणि जितुबेन उधास हे त्यांचे आई–वडील. त्यांनी सर बीपीटीआय भावनगरमध्ये शिक्षण घेतले होते. पुढे ते मुंबईला आले आणि मुंबईतील सेंट झेवियर्स महाविद्यालयात त्यांचे पुढील शिक्षण झाले. १९६४ मध्ये, त्यांनी साधना सरगम सोबत मोहरा चित्रपटातील ना कजरे की धार हे उल्लेखनीय गाणे गायले जे खूप लोकप्रिय झाले. साजन, ये दिल्लगी, नाम आणि फिर तेरी कहानी याद आयी यांसारख्या चित्रपटांमध्ये त्यांनी पार्श्वगायक म्हणून काम केले. डिसेंबर १९८७ मध्ये म्युझिक इंडियाने लॉंच केलेला त्यांचा शगुफ्ता अल्बम भारतात कॉम्पॅक्ट डिस्कवर रिलीज झालेला पहिला अल्बम होता अशा या गझल गायकीच्या दुनियेतील बेताज बादशाह काळाच्या पडद्याआड गेल्याने त्यांच्या चाहत्यांसह मनोरंजन विश्वावर शोककळा पसरली आहे !

राजू जाधव, मांगूर जि.बेळगांव
मो. ९९६४७०२४२५

योग्यता कामावर अवलंबुन नसते, ती काम करणाऱ्यावर व कामावरिल त्याच्या प्रेमावर असते. ● आयुष्यात निश्चित काही मिळवावयाचे असल्यास साहस असावयास पाहिजे.

वऱ्हाडवृत्त
▸ अकोला, वर्ष ८, अंक २०,
बुधवार, २८ फेब्रुवारी, २०२४
www.varhadvrutt.com

# कुटुंबाची वीण घट्ट व्हावी

भारतीय कुटुंबव्यवस्था जगात आदर्श मानली जाते. म वसुधैव कुटुंबकमम हे मूल्य भारताने जगाला दिले. परदेशी नागरिकांनाही या व्यवस्थेचे कमालीचे आकर्षण वाटते. काही विदेशी पर्यटक अजूनही काही ठिकाणी अस्तित्वात असलेल्या संयुक्त कुटुंबांच्या घरांना भेटी देताना आढळतात. तथापि हीच वीण विसविशीत होत चालली असावी का? गत दोन वर्षांत विविध कारणांसाठी कौटुंबिक न्यायालयात खटले दाखल होण्याचे प्रमाण कमालीचे वाढले आहे. २०२१ मध्ये अशा खटल्यांची संख्या सुमारे चार लाख होती. २०२३ मध्ये ती सुमारे आठ लाखांच्या पुढे गेली आहे. त्यात कौटुंबिक वाद, घरगुती भांडणे, घटस्फोट, पोटगीची मागणी, मुलाचा ताबा, माहेरून पत्नीला परत सासरी आणणे अशा विविध खटल्यांचा समावेश आहे. केंद्रीय कुटुंब आणि आरोग्य मंत्रालयाने ही आकडेवारी संकलित केल्याचे वृत्त माध्यमात प्रसिद्ध झाले आहे. ही आकडेवारी भूषणावह नाही. कौटुंबिक कलहाच्या मुळाशी मूल्यांची कमतरता हे देखील एक कारण मानले जाते. मूल्यविहीन समाजाची वाटचाल कोणत्या दिशेने होऊ शकते है दर्शवणाऱ्या घटना समाजात अधूनमधून घडतात.

न्यायालयात वाढणारे दावे हा देखील त्याचाच एक परिणाम समाज, विशेषतः युवा पिढी मूल्यहीन होत चालल्याचे सातत्याने बोलले जाते. त्याच्या पुष्ट्यर्थ समाजात घडणाऱ्या घटनांचा दाखलाही दिला जातो. पुण्यातील वेताळ टेकडीवरील नशेत बेधुंद तरुण–तरुणींचा व्हिडिओ समाजमाध्यमात फिरत आहे. तिथे गेलेल्या नागरिकाने त्याचे चित्रीकरण केले म्हणून त्याकडे समाजाचे लक्ष गेले. तथापि असे दृश्य राज्यात अन्यत्रही आढळण्याची शक्यता नाकारली तरी जाऊ शकेल का? एकत्र कुटुंबपद्धतीचे फायदे आणि तोटेही सांगितले जातात. एकत्र कुटुंब पद्धतीत ताणाचा निचरा होण्याची, संवादाची आणि वादाचे निराकरण होण्याची व्यवस्था आपोआपच निर्माण व्हायची. घरातील ज्येष्ठ मंडळी नातवंडांचे हक्काचे स्थान होती. घरातील किरकोळ वाद सोडवण्यासाठी त्यांचा पुढाकार सहाय्य करायचा. त्यांचा सल्ला युवा पिढीही बऱ्याचदा ऐकायची. काळाचा बदल म्हणून एकल कुटुंबपद्धती समाजानेही स्वीकारली. घरातील तरुण पिढी नोकरीच्या निमित्ताने त्यांच्या शहराबाहेर जाते आणि तिथेच स्थिर होते. असेच बऱ्याचदा घडत असले तरी एकल कुटुंब अस्तित्वात येण्याची हीच कारणे असू शकतील का ?

याचा विचार घरातील ज्येष्ठ आणि तरुण पिढीने करण्याची गरज आहे. कारण त्याचे काही विपरीत परिणाम समाजालाच भोगावे लागतात. एकल कुटुंब पद्धतीचा बदल स्वीकारताना ताण आणि विसंवादाचा निचरा करण्याची व्यवस्था निर्माण करण्याकडे दुर्लक्ष होत असावे का ? घरगुती वादांनी कलहाचे स्वरूप धारण करू नये आणि घराचा उंबरठा ओलांडून ते वाद चव्हाट्यावर येऊ नयेत यासाठीचा किमान समंजसपणाही लोप पावत चालला असावा का ? आईवडिलांचे वाद मुलांचे भावविश्व उद्ध्वस्त करतात याचीही जाणीव होत नसावी की वैयक्तिक अहंकार आणि स्वातंत्र्याचे चुकीचे ग्रह त्यावरही मात करत असावेत? समाजात बाल गुन्हेगारी वाढत आहे, कौटुंबिक न्यायालयांवर ताण आणि युवापिढीत व्यसनाधीनता वाढत आहे. कुटुंबे कमकुवत होतात तेव्हा मूल्ये नष्ट होतात याकडे पंतप्रधानांनी देखील नुकतेच लक्ष वेधून घेतले. कुटुंबाच्या, समाजाच्या आणि पर्यायाने देशाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी कुटुंब व्यवस्था मजबूत व्हायला हवी असेही ते म्हणाले. त्यातील मर्म लक्षात घेण्याइतके शहाणपण ज्येष्ठांकडून आणि युवा पिढीकडून अपेक्षित आहे.

## राष्ट्रीय विज्ञान दिनानिमीत्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन

आज राष्ट्रीय विज्ञान दिन आहे. देशात सर्वत्र साजरा होणाऱ्या या वर्षीच्या विज्ञान दिनाची संकल्पना, 'विकसित भारतासाठी स्वदेशी तंत्रज्ञान' ही आहे. ही संकल्पना भारताच्या भविष्याला आकार देण्यासाठी स्वदेशी तंत्रज्ञानाचं महत्त्व अधोरेखित करते. ज्येष्ठ भौतिकशास्त्रज्ञ सर सी.व्ही. रमण यांच्या 'रमण इफेक्ट' या उल्लेखनीय शोधाच्या स्मरणार्थ विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागामार्फत, नवी दिल्ली इथे आज एका कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. या शोधासाठी, डॉक्टर रमण यांना १९३० मध्ये नोबेल पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं होतं. या दिनाच्या औचित्यानं आयोजित करण्यात आलेल्या प्रदर्शनाचं केंद्रीय विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्री डॉक्टर जितेंद्र सिंह यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. या प्रदर्शनात विविध प्रकारच्या नाविन्यपूर्ण आणि नावोन्मेषक विज्ञान प्रकल्पांचा समावेश आहे.

# भाषा प्रभुत्व, वैचारिक सुबत्ता काळाची गरज

डॉ. महेश अभ्यंकर, मुख्य समन्वयक, ग्रंथ तुमच्या दारी, मुंबई

दि.२७ फेब्रुवारी ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी साहित्यिक वि. वा. शिरवाडकर ऊर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिवस. जगभरात हा दिवस 'मराठी भाषा गौरव दिन' म्हणून साजरा केला जातो. पुढील दोन दशकांमध्ये भारत देशाला वैश्विक गुरू बनविताना मराठी भाषा आणि महाराष्ट्र प्रांत सिंहाचा वाट उचलणार, यात काहीच शंका नाही.

'वाचाल तर वाचाल, वाचाल तर वाढाल, वाचाल तर आनंदी राहाल', वाचनाची आवड हे आपल्याला मिळालेले एक वरदान आहे. ज्ञान मिळविण्याचे एक प्रमुख साधन म्हणजे पुस्तके. व्यक्तिगत आणि सामाजिक कौशल्य हे पुस्तकातून विकसित करता येतात, आत्मचरित्रे वाचली की जीवन जगण्याला प्रेरणा मिळते, नवीन कल्पना सुचतात. 'इमोझील, मनोबल उंचवणाऱ्या कथा' या पुस्तकाने दहा हजार वाचकांचा वेध घेतला. वाचन कधी कधी आनंद मिळविण्यासाठी करावे.

प्रवासवर्णने अथवा विनोदी वाचनामुळे मानसिक तणाव, कंटाळवाणेपणा आणि एकाकीपणा दूर होतो. पुस्तक रोग्याच्या वेदनेवर फुंकर घालते. काही उत्तम भाषांतरित पुस्तके संग्रही ठेवावीत. वाचनाने माणूस चिंतनशील बनतो. वाचन हे आपल्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक, आध्यात्मिक प्रगतीसाठी पोषक ठरते. एक पुस्तक आपल्या आयुष्याला कलाटणी देऊ शकते. माझ्या व्यक्तिगत आयुष्यामध्ये स्वामी विवेकानंदांचा 'कर्मयोग' आमूलाग्र बदल घडविण्यास कारणीभूत झाला.

माझा मराठाचि बोलु कौतुकें । परि अमृतातेंही पैजां जिंके। भाषा हे माणसांमधील संपर्काचे, संवादाचे आणि भावनांच्या अभिव्यक्तीचे प्रगत माध्यम समजले जाते. भाषेची समृद्धी ही माणसाच्या व्यक्तिमत्त्वाची आणि प्रगल्भतेची ओळख असते. मराठी भाषा संस्कृतनंतर जगातील सर्वात सात्त्विक भाषा आहे. मराठी भाषेचे सौंदर्य, माधुर्य, समृद्धता आणि परिपूर्णता असे वेगळेपण आहे. मराठी भाषेतील शब्दभांडाराचा आनंद सर्वांनीच घेतला पाहिजे. मराठी साहित्य ही न संपणारी दौलत आहे, जितकी जास्त लुटाल तितकी ती वाढत जाते.

मराठी पुस्तके जगायला बळ देतात. मातृभाषेमुळे मुलांना बालवयापासून ग्रहण, आकलन आणि स्वयंअध्ययन या क्षमतांचा पुरेपूर विकास करता येतो. मायबोलीतील वाचनामुळे मायबोलीत विचार व्यक्त करण्यास चालना मिळते. भाषाभिमानाचा संबंध थेट राष्ट्राभिमानाशी आहे. भारताला वैश्विक गुरू बनवायचे असेल, तर वैचारिक सुबत्तता आवश्यक आहे. राजकारण, समाजकारण करणाऱ्या आणि जनमानसावर छाप पाडणाऱ्या सर्वांनी भाषा आणि वाचन याचा आस्वाद घेतला पाहिजे.

कुसुमाग्रज प्रतिष्ठान, नाशिक या संस्थेचे माजी विश्वस्त विनायक रानडे यांनी १२ वर्षांपूर्वी केलेल्या निश्चयातून 'ग्रंथ तुमच्या दारी' या योजनेचा उगम झाला. ही योजना नाशिक, पुणे, ठाणे, मुंबई असा दिमाखदार प्रवास करीत महाराष्ट्रभर पोहोचली, त्यानंतर भारतातील इतर राज्यांमध्ये याचा विस्तार झाला. परदेशात दुबई, ओमान, बहारिन, नेदर्लंड, यूएई, टोकियो, अटलांटा, स्वित्झर्लंड, फिनलँड, वॉशिंग्टन डीसी, कॅलिफोर्निया, मॉरिशस, सिंगापूर आणि जपान येथील हजारो वाचकांना मराठी पुस्तके वाचनासाठी उपलब्ध झाली आहेत.

'ग्रंथ तुमच्या दारी' या उपक्रमांतर्गत २५ दृ ३५ वाचकांच्या समूहासाठी साहित्याच्या कथा, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, विज्ञान, इतिहास, अनुवादित, गूढ कथा, आध्यात्मिक, ऐतिहासिक, विनोदी, वैचारिक, ललित लेख, प्रवासवर्णन असे विविध वाङ्मय प्रकार असलेल्या शंभर पुस्तकांची एक ग्रंथपेटी दिली जाते. प्रत्येक ग्रंथपेटीत नवीन व जुन्या विविध लेखकांची पुस्तके असतात. दर चार महिन्यांनी प्रत्येक ठिकाणची ग्रंथपेटी बदलून दुसरी पेटी दिली जाते. यामुळे वाचनासाठी हजारो पुस्तके उपलब्ध आहेत.

मुंबई शहर गतिमान शहर आहे, आर्थिक राजधानी आहे, चांगल्या गोष्टी लवकर आत्मसात करते, घराजवळ उत्तम वाचनीय पुस्तके उपलब्ध झाली, हे मुंबईने लगेच स्वीकारले. घर आणि सोसायटी शिवाय शाळा, ऑफिस, मंदिर, हॉस्पिटल, दवाखाना, आश्रम, उद्यान, ज्येष्ठ नागरिक संघ, महिला मंडळ, सामाजिक संस्था, पोलीस ठाणे, तुरुंग, इ. ठिकाणी मुंबईत १७५ वाचक केंद्रे आहेत. गोरेगाव दृ मालाड, कांदिवली ते भाईंदर, जोगेश्वरी, अंधेरी ते बांद्रा, दादर ते कुलाबा आणि वडाळा, कुर्ला, पवई, घाटकोपर, भांडुप, देवनार, गोवंडी, ऐरोली अशा विविध विभागांमध्ये पसरली आहे, स्वेच्छेने काम करणाऱ्या २०० हून अधिक समन्वयकांमुळे हा उपक्रम वाढीस लागला आहे. महिन्यातून १–२ पुस्तके तरी वाचा. आवडलेले मुद्दे एका वहीत टिपून ठेवा. त्यावर मनन, चिंतन आणि विश्लेषण करा. आजच्या नेटयुगात संगणकाच्या पडद्यावर क्षणार्धात पुस्तकेच्या पुस्तके आणि वैचारिक मंथन उपलब्ध होऊ शकते. तरीही प्रत्येक व्यक्तीने, शिक्षकांनी, पालकांनी, सामाजिक आणि राजकीय संघटना यांनी मुलांना, तरुणांना वाचनाची गोडी लावावी.

मातृभाषेचे संवर्धन करा. मराठी भाषेचा विकास व संवर्धन व्हावे, मराठी वाचनसंस्कृती रुजावी व वृद्धिंगत व्हावी, या एकमेव ध्येयाने प्रेरित असलेला 'ग्रंथ तुमच्या दारी' हा उपक्रम कौतुकास्पद कामगिरी करीत आहे. जेथे जेथे मराठी माणूस आहे, जेथे जेथे शक्य आहे, त्याच्यापर्यंत 'ग्रंथ तुमच्या दारी' या उपक्रमाचे पाऊल पडावयास हवे. मराठी वाचकांपर्यंत मराठी ग्रंथसंपदा पोहोचल्यामुळे त्यांचे मराठी वाङ्मयाशी नाते वृद्धिंगत होते. 'सोसायटी तिथे, ग्रंथ पेटी' असा आमचा मानस आहे. सर्वांनी उपक्रमाशी जुडावे. "पुस्तक एक सखा आहे, मार्गदर्शक आहे, जीवनप्रेरक आहे. पुस्तकांना जीवनाचा अविभाज्य भाग बनवा".

## दिव्यांग खेळाडूंना राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्रात प्रशिक्षण देण्यात येणार



राष्ट्रीय उत्कृष्टता केंद्र अर्थात एन सी ओ ई अंतर्गत, येणाऱ्या, भोपाळ, बंगळुरू, गांधीनगर, कोलकाता, लखनौ, त्रिवेंद्रम, पटियाला, मुंबई, सोनीपत आणि नवी दिल्लीतील डॉ करणी सिंग नेमबाजी केंद्रात, २०० दिव्यांग खेळाडूंना प्रशिक्षण देण्यात येईल असं क्रीडा मंत्री अनुराग सिंह ठाकूर यांनी सांगितलं आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वाखाली सर्वसमावेशक दृष्टिकोन स्वीकारून, क्रीडा क्षेत्राला पुढे नेण्यासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलली जात आहेत असं ठाकूर यांनी एका दूरदृश्य संदेशात म्हंटलं आहे. देशातील नागरिकांनी दिव्यांग खेळाडूंचं कौतुक करत, त्यांच्या कर्तृत्वाचा अभिमान बाळगत त्यांच्या आत्मविश्वासाला सलाम करावा आणि त्यांच्या विशेष क्षमतेचा विजय साजरा करावा, असं आवाहन ठाकूर यांनी देशवासियांना केलं आहे.

जो व्यवहारी पुरुष मिळकतीपेक्षा कधीही खर्च वाढवीत नाही, तो केव्हाही संसारात आपत्तीने तंग होत नाही. जो पुरुष भाग्यावरच भरवसा ठेवून निष्कष्टी राहतो, त्याचे भाग्य कधीही उदयास येत नसते.

RNI Reg. No. MAHMAR/2016/71990
Postal Regn. No. Akola Dn./234/2023-2025
वऱ्हाडवृत्त
दर बुधवारी **प्रकाशित** होते.
दर गुरूवारी **पोस्टींग** केल्या जाते.
वार्षिक वर्गणी रू. ३००/- (विशेषांकासह)

**कार्यकारी संपादक :** सौ.प्रियंका सागर लोडम, e-mail: muktagraphics20@yahoo.co.in
**निवास :** २०,'अंतर्नाद', गोकुळ कॉलनी, अकोला, मो. 9850471520

प्रति, पुस्त–प्रेष

## भारताचे नवे लोकपाल म्हणून न्यायमूर्ती अजय माणिकराव खानविलकर यांची नियुक्ती



नवी दिल्ली : सर्वोच्च न्यायालयातले सेवानिवृत्त न्यायमूर्ती अजय खानविलकर यांची देशाचे नवे लोकपाल म्हणून नियुक्ती झाली आहे. मे २००० पासून एप्रिल २०१३ पर्यंत ते मुंबई उच्च न्यायालयात कार्यरत होते. मे २०१६ ते जुलै २०२२ दरम्यान ते सर्वोच्च न्यायालयात न्यायाधीश होते. मुंबईत त्यांनी कायद्याचं शिक्षण घेतलं आहे. खानविलकर यांच्यासह ६ सदस्यांच्या नियुक्तीला राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी मंजुरी दिली. त्यात न्यायमूर्ती लिंगप्पा नारायण स्वामी, न्यायमूर्ती संजय यादव, न्यायमूर्ती रितू राज अवस्थी, सुशील चंद्र, पंकज कुमार आणि अजय तिर्की यांचा समावेश आहे.

## मराठा समाजाला १० टक्के आरक्षण देणाऱ्या विधेयकाला राज्यपालाची मंजुरी

मराठा समाजाला शिक्षण आणि नोकरीत १० टक्के आरक्षण देणाऱ्या सामाजिक आणि शैक्षणिक विधेयकाला राज्यपाल रमेश बैस यांनी संमती दिली आहे. यासंदर्भातलं राजपत्र राज्य सरकारनं आज प्रसिद्ध केलं. नॉन–क्रिमिलेयर गटात मोडणाऱ्या मराठा समाजातल्या नागरिकांना या आरक्षणाचा लाभ मिळेल.

२६ फेब्रुवारी रोजी रिक्त असणाऱ्या आणि रिक्त होणाऱ्या पदांच्या भरती प्रक्रियेत हे आरक्षण लागू होईल. राज्यातली सर्व शासकीय, निमशासकीय कार्यालयं, स्थानिक स्वराज्य संस्था, शिक्षण संस्था, सहकारी संस्था, शासकीय उपक्रमांमध्ये नोकरीसाठी हे आरक्षण दिलं जाईल.

## मराठा आरक्षण आंदोलनाची विशेष तपास पथकामार्फत चौकशी




अकोला : मराठा आरक्षण आंदोलनाच्या आडून अशांतता पसरवल्याच्या आरोपांची विशेष तपास पथकामार्फत चौकशी करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानपरिषदेत केली. मराठा समाजाला सरकारनं संपूर्ण अभ्यास करून कायद्याच्या कसोटीवर टिकणारं आणि विरोधी पक्षांना विश्वासात घेऊन आरक्षण दिलं आहे, जातीय कलह निर्माण करण्याचा प्रकार खपवून घेणार नाही असा इशारा त्यांनी दिला.या मुद्द्यावरुन विधानपरिषदेत सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये शाब्दिक खडाजंगी आणि गदारोळ झाला. त्यामुळे कामकाज तीनदा तहकूब करावं लागलं. तसंच विरोधकांनी सभात्यागही केला.

राज्य सरकारनं मराठा समाजाला आरक्षण दिल्यानंतरही राज्यात अशांतता आणि अराजकता पसरवली जात आहे असं सांगत हा कट रचण्यामागचा सूत्रधार शोधून काढून याप्रकरणी गुन्हा दाखल करून एसआयटी मार्फत चौकशी करावी अशी मागणी भाजपा गटनेते आज प्रवीण दरेकर यांनी केली. जरांगे यांच्या सभांसाठी इतक्या मोठ्या प्रमाणात खर्च कुठून करण्यात आला त्या आर्थिक व्यवहारांची ईडी मार्फत चौकशी करावी अशी मागणी देखील त्यांनी केली. विधान सभेत आशिष शेलार यांनी आज ही मागणी केली. ती अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी स्वीकारुन शासनाला निर्देश दिले.

## संत गाडगेबाबा जयंती वऱ्हाडी बोलीभाषा दिवस साजरा

### 'काहून' मधील कविता बोलक्या, हृदयस्पर्शी आणि डोळे पाणावणाऱ्या ! शिवलिंग काटेकर यांचे प्रतिपादन

अकोला : वऱ्हाडी साहित्य व बोलीभाषा संवर्धन संस्था अकोला द्वारा संचालित अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंचाच्या वतीने मराठा सेवा संघ कार्यालयात संत गाडगेबाबा जयंती वऱ्हाडी बोलीभाषा दिवस म्हणून साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुष्पराज गावंडे सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ मुंबई होते. यावेळी मंचावर प्रा. सदाशिव शेळके आणि वासुदेव खोपडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्या राणे यांनी केले. वऱ्हाडी बोलीभाषा दिवसाच्या निमित्ताने कवी रवींद्र दळवी यांच्या 'काहून' या कवितासंग्रहावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. चर्चासत्रामध्ये बोलताना साधना काळबांडे यांनी कवितासंग्रहाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकला. वऱ्हाडी बोलीभाषेतील लोप पावत असलेल्या अनेक शब्दांना जपण्याचे काम हा संग्रह करतो. काळानुसार बदललेल्या जीवनाचे संदर्भ काहून कविता संग्रह टिपतो असे त्यांनी प्रतिपादन केले. अंकुर साहित्य संघाचे कार्याध्यक्ष तुळशीराम बोबडे यांनी काहून काव्यसंग्रहातील भाषा सौंदर्यावर भाष्य केले. त्यांनी वऱ्हाडी बोलीभाषेतील नैसर्गिक भाव, अस्सल शब्दकळा आणि वऱ्हाडी बाज उपयोजलेली दर्जेदार साहित्यकृती म्हणजे काहून काव्यसंग्रह होय. असे विचार व्यक्त केले. उपस्थित रसिकांच्या वतीने युवा कवी अजय इंगळे यांनी मराठीच्या इतर बोलीभाषा मधील 'काहून' या वऱ्हाडी कविता संग्रहाचे वेगळेपण मांडले. एकंदर रवींद्र दळवी यांच्या 'काहून' कवितासंग्रहाच्या निमित्ताने बोलीभाषा आणि प्रमाण भाषा यांचा परस्पर सहसंबंध यावर साधक बाधक चर्चा झाली. अध्यक्षीय मनोगतात पुष्पराज गावंडे यांनी अखिल भारतीय वऱ्हाडी साहित्य मंच बोलीभाषा जतन व बोली भाषेत साहित्य निर्मिती अशी दुहेरी कामगिरी करत असल्याबाबत अभिनंदन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. गणेश मानकर यांनी

## पश्चिम बंगाल रामनवमी हिंसाचार प्रकरणी एनआयएकडून १६ जणांना अटक

पश्चिम बंगालमध्ये गेल्या वर्षी रामनवमीच्या कार्यक्रमात झालेल्या हिंसाचार प्रकरणी राष्ट्रीय तपास यंत्रणेनं १६ जणांना अटक केली आहे. धार्मिक मिरवणुकीदरम्यान विशिष्ट समुदायावर कट रचून हल्ला करण्याच्या आरोपाखाली ही अटक करण्यात आली आहे.

चौकशी दरम्यान समोर आलेल्या माहितीच्या आधारे तसंच या हिंसाचाराच्या घटनेच्या चित्रफितीच्या आधारे ही अटक करण्यात आली. पश्चिम बंगालमधील उत्तर दिनाजपुर जिल्ह्यात गेल्या वर्षी ३० मार्च रोजी रामनवमीच्या दिवशी ही हिंसाचाराची घटना घडली. राष्ट्रीय तपास यंत्रणा पुढील तपास करत आहे.

## पी.एम. किसान सन्मान निधीच्या लाभासाठी ई–केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन

अकोला, दि. 27 : प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेंतर्गत 16 वा हप्ता व नमो किसान महासन्मान निधीचा दुसरा व तिसऱ्या हप्त्याचे राज्यातील लाभार्थ्यांना वितरण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. जिल्ह्यातील कुणीही पात्र व्यक्ती या योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये यासाठी ई–केवायसी पूर्ण करण्याचे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी शंकर किरवे यांनी केले आहे.

पीएम किसान योजनेत सर्व पात्र लाभार्थ्यांचे ई–केवायसी, बँक खाते आधार संलग्न करणे व भूमी अभिलेख नोंदी अद्ययावत करणे या बाबी शासनाने बंधनकारक केलेल्या आहेत. तरी ज्या लाभार्थ्यांचे ई–केवायसी व बँक खाते आधार संलग्न नाही अशा व्यक्तींनी तत्काळ पूर्तता करून घ्यावी. याबाबत कृषी विभागामार्फत मोहिमही राबविण्यात आली; पण अद्यापही अकोला जिल्ह्यात एकूण तीन हजार 105 व्यक्तींची ई–केवायसी व पाच हजार 336 व्यक्तींचे बँक खाते आधार संलग्नीकरण प्रलंबित असल्याचे दिसून येत आहे. तरी सर्व लाभार्थीनी शासनाने बंधनकारक केलेल्या बाबींची पूर्तता करून घ्यावी. काही अडचण असल्यास संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालय किवा कृषि सहाय्यकाशी संपर्क करावा, असे आवाहन श्री. किरवे यांनी केले.

## मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरें कलमाच्या अंमलबजावणीसाठी ठिकठिकाणी रास्तारोको

जालना : मराठा आरक्षणासंदर्भात राज्य सरकारनं काढलेल्या अधिसूचनेतल्या सगेसोयरेंची अंमलबजावणी करण्यात यावी या मागणीसाठी दि.24 रोजी जालना जिल्ह्यात ठिकठिकाणी रास्तारोको आंदोलन करण्यात आलं. भोकरदन, अंबड, बदनापूर तालुक्यातल्या मुख्य रस्त्यांवर मराठा आंदोलकांनी रास्तारोको करत प्रशासनाला निवेदन सादर केलं. दरम्यान, बदनापूर तालुक्यातल्या धोपटेश्वर आणि बाजार गेवराई इथं आंदोलक आणि पोलिसांमध्ये शाब्दिक चमकम झाल्यामुळे पोलिसांना सौम्य बळाचा वापर करावा लागला. काही आंदोलकांना पोलिसांनी ताब्यात घेतल्यामुळे काही वेळ तणाव निर्माण झाला होता. छत्रपती संभाजीनगर इथंही मुकूंदवाडी भागात मराठा समाज बांधवांच्या वतीनं रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. नांदेड शहरासह जिल्ह्यातही मराठा समाजाच्या वतीने ठिकठिकाणी रास्ता रोको आंदोलन करण्यात आलं. तुळजापूर– नागपूर या राष्ट्रीय महामार्गावरील सोनखेड इथं दोन तास आंदोलन झालं.

हे पत्र प्रकाशक, मालक, संपादक श्री सागर बाबाराव लोडम यांनी मुद्रक मनोहर प्रभुदास मोहोड, श्री महाविर प्रिंटर्स, जुने अकोट स्टँड, अकोला येथे छापून मुक्ता मल्टीव्हिजन ग्राफिक्स, पाटणे मार्केट, रणपिसे नगर, अकोला -४४४ ००१, महाराष्ट्र. येथून प्रकाशित केले. (संपादकीय लेखाव्यतिरिक्त इतर मजकूरातील मतांशी सहमत आहे असे नाही.)
This Issue editor, owner, publisher Sagar B. Lodam has published at Mukta Multivision Graphics, Patane Market, Ranpise Nagar, Akola and printed at Manohar P. Mohod, Shri Mahavir Printer, Old Akot Stand, Akola. Editor Sagar B. Lodam (Without editorial, editor is not agreed with any articles )